# नि.दि.मु.क्र.०४/२०१४ मधील निशाणी क्र.१५७ वरील आदेश
# (CNRNo.MHSI090000042014)

०१. अर्ज व त्यावरील प्रतिवादींचा जबाब वाचला. उभय पक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला.

०२. प्रस्तूतच्या अर्जान्वये प्रतिवादी क्र.१० चंद्रकांत श्रीधर कोयंडे यांच्या वारसांना दाव्याच्या अभिलेखावर घेण्यास विनंती केलेली आहे. दप्तरी दाखल असलेल्या मृत्यूप्रमाणपत्रावरुन प्रतिवादी क्र.१० चंद्रकांत श्रीधर कोयंडे हे दि.०७/०२/२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र. १०अ ते १०ड हेच मयत प्रतिवादी क्र.१० यांचे वारस असल्याचे अर्जात नमूद केलेले आहे. दाव्याचे स्वरुप बघता दाव्याचे कारण अबाधित राहत असल्याने व दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका २२ ची व्याप्ती लक्षात घेता अर्ज मंजूर करणे न्यायसंगत वाटते. परिणामी, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

## – आदेश –

०१. निशाणी क्र. १५७ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. मयत प्रतिवादी क्र.१० यांच्या वारसांना दाव्यात समाविष्ट करुन दुरूस्ती प्रत पुढील तारखेस किंवा त्यापुर्वी दाखल करावी.

३. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2022.07.15 11:09:41 +0530

स्थळ : देवगड

(एस.बी.वाळके)

दिनांक : १४/०७/२०२२

दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.